# Good Work Of Nagpur Rural Police

## पोलीस अधिक्षक कार्यालयात ध्वजारोहण व प्रशंसापत्र वाटपाचा कार्यक्रम उत्साहात साजरा.

## दिनांक -३०/०८/२०१६ (मंगळवार)

आज दिनांक १५ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ७.५० वा. पोलीस अधिक्षक कार्यालय येथे पोलीस अधिक्षक श्री. अनंत रोकडे यांच्या शुभहस्ते, ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. आणि या कार्यक्रमानंतर पोलीस अधिक्षक कार्यालयातील विविध शाखेमध्ये उत्कृष्टरीत्या उल्लेखनीय व गुणवत्तापुर्ण कार्यासाठी स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ देवुन त्यांचा गौरवांकित सत्कार करण्यात आला.



यामध्ये स्थानिक गुन्हे शाखेमधुन पोलीस निरीक्षक संजय पुरंदरे, सहा. पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर, उल्हास भुसारी, ए.एच. जारवाल यांनी गुन्हे तपासात उत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत, चासफौ. २५ साहेबराव बहाळे, पोहवा/१६७० राजेंद्र सनोडीया, पोहवा/७७० लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा/१६०२ शशी शेंडे, पोहवा/४६३प्रमोद बन्सोड, नापोशि/३४ शैलेश यादव, नापोशि/४९४ अविनाश राऊत, नापोशि/१४६९ रामा आडे, नापोशि/४६७ सुनिल मिश्रा, नापोशि/६२५ निलेश बर्वे, पोशि/२१६२ नितेश रोहणकर यांनी गुन्हे तपासात उत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत. माहिती कक्ष/पी.आर.ओ. या शाखेमधुनसहा. पोलीस निरीक्षक वर्षा अंबादास वंजारी , पोशि/१३३३ डार्विन आनंदराव शेंडे, मपोशि/९०९ लिना दामोधर लोंदे यांनी वेबसाईटवर तीन वेळा प्रेस नोट, गुडवर्क,पॉझिटीव्ह स्टोरी अपलोड करणे, तसेच ऑनलाईन माहितीचा अधिकारामध्ये नोडल ऑफीसर म्हणुन उत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत,अर्ज शाखेमधुनपोहवा/१५०३ राजेश पिंपळे यांनी मा. वरिष्ठ अधिकारी, मंत्री महोदय, लोकआयुक्त,

जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयीन उत्तम पत्रव्यवहार केलेबाबत पोलीस अधिक्षक श्री. अंनत रोकडे यांच्या हस्ते प्रशंसापत्र देण्यात आले.

पोलीस अधिक्षक कार्यालय लिपीक वर्ग शाखेमधुन प्रमुख लिपीक लेखा शाखा श्री. विनायक टिपरे, वरिष्ठ श्रेणी लिपीक पत्रव्यवहार शाखा श्री. रविन्द्र एल. पाटील, वरिष्ठ श्रेणी लिपीक आस्थापना शाखा श्री. प्रकाश पी. गणवीर, कनिष्ठ श्रेणी लिपीकलेखा शाखा कुमारी रिता गद्रे,



चपराशी श्री. अभय डांगोरे, चपराशी श्री. राहूल खोब्रागडे, चपराशी श्री. सोपान बाबुराव कांबळे यांच्या उत्कृष्ट कामगिरीबाबत, बॉम्बशोधक व नाशक पथकामधुन सपोनि श्री. मनोहर बळीराम रैतीया, पोहवा/१६४५शैलेष रेंगारामजी देशभ्रतार, नापोशि/१८०६ अजय चंद्रभानजी खिरोडे, पोशि/२००४ अमोल कैलासराव महाबुधे, पोशि/२१०० तुषार पुरूषोत्तम पाटिल यांनी मौदा अंतर्गत चाचेरे रेल्वे स्टेशन परिसरात बॉम्ब नाश केलेबाबत. महिला सहायता कक्ष शाखेमधुन मपोहवा/१४०६ चंदा रमेश खैरकर, मनापोशि/१७६३ स्नेहलता तेजराव ढवळे यांनी केसेसचा उत्तमप्रकारे निपटारा केल्याबाबत. पोलीस नियंत्रण कक्षामधुन पोउपनि. रमेश नत्थुजी ताजने,सफौ/१२७४ भरतसिंग ठाकुर, पोहवा/३५७ राजेंद्रप्रसाद वर्मा, पोहवा/१२८४ अशोक शिरभाते, पोशि/ १९४३ सचिन भेंडकर यांच्या उत्कृष्ट कामगिरीबाबत. सायबर सेलमधुन सहा.पोलीस निरीक्षक श्री. अरविंद प्रल्हाद सराफ, नापोशि/९७९ श्री. अजय मुरलीधर तिवारी, मनापोशि/१७६६ कु. वर्षा गोपालराव खंडाईत, पोशि/१९७९श्री. चेतन रमेश राऊत, मपोशि/१६३६ संगिता कृष्णाजी वाघमारे, पोशि/२२१९ श्री.सचिन प्रभाकर किन्हेकर यांच्या उत्कृष्ट कामगिरीबाबत. बिनतारी संदेश विभागातुन पोलीस उपनिरीक्षक,बि.स.(वाहतूक)श्री.व्यासशंकर अनुसयाप्रयाद पांडे, सहा.पो.उप. नि.(रेडिओ यांत्रिकी) श्री. राजू सदाशिव मते, पोहवा (बिनतारी यंत्रचालक) श्री. राजेश हरिचंद्र डोंगरे यांच्या उत्कृष्टरीत्या कामगिरीबाबत. मानव संसाधन शाखेमधुन पोहवा/१५८५ अमजत अली सैय्यद यांनी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत. वाहतूक शाखेमधुन पोहवा/११९४ महेंद्र सुदाम सरपटे, मपोशि/१०१४रिना महादेवराव जुनघरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत त्यांचा प्रशंसाप्रत्र व पुष्पगुच्छ देवुन गौरवाकिंत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. सतिशसिंह राजपूत, नियंत्रण कक्षचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष वैरागडे, वाचक शाखा पोलीस अधिक्षक कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री. हेमंत चांदेवार,वाचक शाखा अपर पोलीस अधिक्षक कार्यालयाचेसहायक पोलीस निरीक्षक श्री. मोते, स्था.गु.शाखेचे श्री. संजय पुरंदरे, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद मडामे, बिनतारी संदेश विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल साखरे, मोटर परिवहन विभागचे पोलीस निरीक्षक श्री. अजित देशपांडे, राखीव पोलीस निरीक्षक, श्री. सतिश रींगणे, महिला सहायक कक्षाच्या सपोनि. श्रीमती कल्पना बत्तासे,अर्ज शाखेचे सपोनि विश्वास पुल्लरवार, सायबर सेलचे सपोनि. श्री. सराफ, पीआरओ शाखेचे श्रीमती वर्षा वंजारी, कल्याण शाखेचे सपोनि श्री. मेश्राम, यांचेसह कार्यालयातील कर्मचारी मोठया संख्येत ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित होते.



पोलीस अधिक्षक कार्यालयातील शाखेमध्ये उत्कृष्टरीत्या व उल्लेखनीय कार्यासाठी प्रशस्तीपत्रक देतांना ,पोलीस अधिक्षक श्री.अनंत रोकडे .जिल्हा– नागपूर (ग्रामिण).

# दिनांक १५/०८/२०१६ रोजी नागपूर (ग्रामिण) पोलीसांच्या 'नविन सायबर लॅब ' चा उद्घाटन सोहळा संपन्न.

फेसबुक,व्हॉटसअप, व्टिटर, ऑनलाईन शाम्पींग, ऑनलाईन बॅंकींग,सोशल नेटवर्कींग व इंटरनेटचा दिवसेंदिवस वाढणारा वापर व त्यामुळे वाढणारे सायबर क्राईम यांचे सखोल तपास करणेकरीता तसेच त्यावर वेळीच प्रतिबंध करून गुन्हेगारांना गजाआड करणे व काही प्रसंगी सोशल मिडीयाच्या गैरवापरामुळे उद्‌भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न मार्गी लावणेकरीता श्री. देवेंद्र फडणवीस,मुख्यमंत्री व गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने व संकल्पनेतुन साकारण्यात आलेल्या नागपूर (ग्रामीण) जिल्हा पोलीस सायबर लॅबचा उद्घाटन सोहळा दिनांक १५/०८/२०१६ रोजी स्वातंत्र दिनाच्या पर्वावर सकाळी ११.०० वा. पोलीस अधिक्षक कार्यालय,नागपूर (ग्रामीण),



नागपूर येथे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून आमदार श्री. सुनिल केदार सावनेर विधानसभा क्षेत्र,श्री. रविंद्र कदम (भापोसे) विशेष पोलीस महानिरीक्षक,नागपूर परिक्षेत्र, नागपूर,श्री. सोनवने,पोलीस अधिक्षकबिनतारी संदेश विभाग,नागपूर हे प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात श्री. चंद्रशेखर बावनकुळे,पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी नागपूर (ग्रामीण) जिल्हयाला सायबर गुन्हे मुक्त जिल्हा बनविणेकरीता प्रयास करण्याचा प्रयत्न सुरू झालेला असून भविष्यात सायबर सेल गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात यशस्वी होईल. या उपक्रमात सत्ताधारी पक्षासह विरोधी पक्षांनी सुद्धा सहकार्याची भूमिका घेतलेली आहे, हे महत्त्वपुर्ण कार्य आपण सर्वांनी मिळून यशस्वी करू त्यात जनतेनी सुद्धा सहकार्य करावे असे आवाहन केले. कमीत कमी वेळेत सायबर तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगारांना जेरबंद करून गुन्हयांना आळा घालता यावा, हे मुख्य उद्देश्य सदर सायबर लॅब स्थापण्याचा आहे असे सांगितले.

नागपूर (ग्रामीण) जिल्हा पोलीस दलातील सर्व पोलीस स्टेशनला पोलीस अधिक्षक कार्यालयाशी जोडणेकरीता प्रस्तावित व्हिडीओ कॉन्फरसिंग प्रधाली तयार करणेकरीता ५० लाख रूपये डिपीडीसी फंडातून मंजुर करीत असल्याचे त्यांनी या प्रसंगी जाहीर केले.



तसेच नागपूर (ग्रामीण) जिल्हा पोलीस दलातील एकुण २१०८ पोलीस कर्मचाऱ्यांची पोलीस दलात नियुक्तीपासुन सेवाकालातील अद्यावत नोंदी त्यांचे सेवापटात नोंदविण्यात आलेल्या सेवापटातील संपुर्ण माहिती पोलीस कर्मचाऱ्यांना मिळावी हा दुरदृष्टीकोन लक्षात घेवून श्री. अनंत रोकडे,पोलीस अधिक्षक,नागपूर (ग्रामीण), नागपूर यांच्या संकल्पनेने तयार करण्यात आलेले **''संगणक प्रणित सर्व्हिस शिट किऑस्क प्रणाली''** चे उद्घाटन या कार्यक्रमात करण्यात आले आहे. नागपूर (ग्रामीण) जिल्हा पोलीसांनी एक चांगले पाऊल उचलले असे उद्गार त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

गुन्हयातील भौतिक पुरावा गोळा करण्याकरीता व दोषसिद्धीचे प्रमाणात वाढ होवून गुन्हेगार गजाआड करण्याकरीता पोलीस तपासात भौतिक सुधारणा करण्याचा व्यापक दृष्टीकोन लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने नागपूर (ग्रामीण) जिल्हा पोलीस दलाला प्रदान केलेल्या आधुनिक फॉरेंसिक मोबाईल व्हॅनचे उद्घाटनसुद्धा याच कार्यक्रमात करण्यात श्री. सुनिल केदार, आमदार सावनेर विधानसभा क्षेत्र यांच्या हस्ते करण्यात आले आहे.



सदर कार्यक्रमात श्री. अनंत रोकडे,पोलीस अधिक्षक नागपूर, नागपूर (ग्रामीण),श्री. नरसिंग शेरखाने,अपर पोलीस अधिक्षक,नागपूर ग्रामीण, श्री. सतिश राजपूत,प्र. पोलीस उपअधिक्षक, मुख्यालय नागपूर (ग्रामीण),श्री. राजन पाली,पोलीस उपअधिक्षक, युओटिसी,नागपूर, श्री. विक्रांत कदम, प्र. पोलीस उपअधिक्षक,

श्री. संजय पुरंदरे,पोलीस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा, श्री. मडामे, पोलीस निरीक्षक जिवीशा,श्री. चांदेवार,पोलीस निरीक्षक, वाचक शाखा,श्रीमती वर्षा वंजारी,पिआरओ, नागपूर (ग्रामीण), श्री. अनिल ठाकरे, उपसंचालक,माहिती जनसंपर्क कार्यालय,श्री. साबु, प्रेसिडेंट,व्हिसीएमडब्ल्यूए, श्री. इंदुरकर कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग व त्यांची चमु,मैत्री परिवाराचे श्री. चंदु पेंडके, श्री. सुहास खरे व पेपर तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे पत्रकारगण प्रामुख्याने उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने अल्पावधीत आखून दिलेला जिल्हा पोलीस सायबर लॅबचा भव्य उपक्रम अवघ्या १५ दिवसात अहोरात्र परिश्रम करून पुर्णत्वास नेणारी सायबर चमुचे श्री. अरविंद सराफ,सपोनि व त्यांचे सहकारी अजय तिवारी, चेतन राऊत, संगीता वाघमारे,वर्षा खंडाईत,सचिन किन्हेकर याचां पोलीस अधिक्षक श्री. अनंत रोकडे यांनी प्रशंसापत्र देवून याप्रसंगी सत्कार केला तसेच सा. बा. विभागाचे श्री. इंदुरकर व त्यांची चमु तसेच कंत्राटदार श्री. पराग मुंजे यांचा श्री. रविंद्र कदम, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या हस्ते प्रशंसापत्र देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन पोउपनि. श्री. नरेंद्र तायडे यांनी केले.



## नागपूर जिल्हा (ग्रामीण), पोलीस क्रिडा स्पर्धा २०१६ चा निरोप समारंभ व बक्षिस वितरणाचा कार्यक्रम संपन्न

दिनांक २४/०८/२०१६रोजी सांयकाळी १६.१० वा. च्या दरम्यान **आंतर जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा-२०१६**चा''निरोप समारंभ वबक्षीस वितरणाचाकार्यक्रम'' हा विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र, नागपुर श्री. रविंद्र कदम यांचे शुभहस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन अपांरपारिक अभियान प्रशिक्षण केंद्राचे सेवानिवृत्त प्राचार्य मा. श्री. समशेर सिंग हे प्रामुख्याने उपस्थित होते. व याच वेळी १०० मि. (पुरुष व महिला) धावण्याची स्पर्धा, संगितखुर्ची, १० वर्षाखालील मुला मुलीकरीता लिंबु चम्मच व पोता दौड असे खेळ खेळण्यात येवुन विजेत्यांचा बक्षिस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आले.



**आंतर जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धेच्या** निरोप समारंभ व बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण नागपुर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक श्री. अनंत रोकडे यांनी करून प्रमुख अतिथी विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र, नागपुर श्री. रविंद्र कदम यांचे स्वागत केले. तसेच प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्राचार्य मा. श्री. समशेर सिंग यांचेही स्वागत करण्यात आले. पोलीस अधिक्षक यांच्या हस्ते प्रमुख अतिथी यांना कार्यक्रमादरम्यान स्मृतीचिन्हही प्रदान करण्यात आले.

**आंतर जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा-२०१६** हे **दि. २०/०८/२०१६ ते २४/०८/२०१६रोजी पर्यंत पोलीस मुख्यालय, नागपूर (ग्रामीण), टेकानाका येथे**घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे उद्घाटन दि. २२/०८/२०१६ रोजी मा. श्री. संजय इंदुरकर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ , नागपूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले होते. सदर क्रिडा स्पर्धेचे आयोजन हे नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक श्री. अंनत रोकडे आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.या स्पर्धेमधील खालील विजेत्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक मा. श्री. रविंद्र कदम यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.



**सदर स्पर्धेत विजेत्या खेळाडुची नावे :-**

**महिला :- १०० मि. धावणे -**प्रथम हेमलता परशुरामकर, द्वितीय भाग्यश्री हलमारे, **२०० मि. धावणे -महिला:** प्रथम हेमलता परशुरामकर, द्वितीय दिपा लटपटे, **४०० मि. धावणे- प्रथम** भाग्यश्री हलमारे, द्वितीय हेमलता परशुरामकर, **८०० मि. धावणे** : **प्रथम**हेमलता परशुरामकर, द्वितीय गारगी चरडे, **१५०० मि. धावणे-प्रथम** सिमा अख्तर, द्वितीय भाग्यश्री हलमारे, **५००० मि. धावणे-प्रथम**-हेमलता परशुरामकर, द्वितीय प्रगती नारनवरे, **४ × १०० मी रिले -: प्रथम**-हेमलता परशुरामकर,शबनम अब्दुल,रिता तायडे,दिपा लटपटे **द्वितीय** -मृणाली चाके, पुनम मानकर,भाग्यश्री हलमारे, वनश्री बांते,**४ × ४०० मी. रिले : प्रथम -**शबनम अब्दुल, मोनाली राजुरकर, दिपा लटपटे, हेमलता परशुरामकर **द्वितीय** : -पुजा पांडे, कांचन शेंद्रे, कल्पना सलामे, गारगी चरडे **लांब उंडी- प्रथम**-भाग्यश्री हलमारे, **द्वितीय**-हेमलता परशुरामकर, **उंच उडी -प्रथम**-भाग्यश्री हलमारे, **द्वितीय**-प्रिया महल्ले, **गोळा फेक - प्रथम**-मृणाली चाके, **द्वितीय**-स्वाती नागदेवे**थाळी फेक : प्रथम**- मृणाली चाके, **द्वितीय**- पल्लवी रेहपाडे, **भाला फेक** : प्रथम -पुनम मानकर, **द्वितीय**- भाग्यश्री हलमारे

**पुरुष** :- **१०० मि. धावणे-प्रथम:** पंकज परतेती, **द्वितीय -**पंकज चावरे**, २०० मि. धावणे**- पुरुष: **प्रथम** हेमंत चौरसिया**, द्वितीय -**पंकज परतेती, **४०० मि. धावणे** पुरुष: **प्रथम** पंकज परतेती**, द्वितीय -**हेमंत चौरसिया, **८०० मि. धावणे- प्रथम**पंकज परतेती, **द्वितीय**-ज्ञानेश्वर पोले, **१५०० मि. धावणे-प्रथम**ज्ञानेश्वर पोले **द्वितीय**-गणेश ताजने, **५००० मि. धावणे-प्रथम**ज्ञानेश्वर पोले, **द्वितीय**अमोल झाडे**१०००० मि. धावणे - प्रथम**ज्ञानेश्वर पोले, **द्वितीय**-गणेश ताजने, **४×१०० मी रिले -: प्रथम**-रोशन नारनवरे, हेमंत चौरसीया, ओमप्रकाश तिरपुडे,कुलदीप अहाके **द्वितीय**-राजेश डाकेवार, सचिन पब्बेवार,केवल आडे, पंकज परतेती **४ × ४०० मी. रिले : प्रथम -** पंकज परतेती, सचिन पब्बेवार, संदीप भोंडे, आकेश मडावी **द्वितीय** : -ज्ञानेश्वर पोले, गणेश ताजने, नितेश पुसाम, नविन पाटील**लांब उंडी- प्रथम**-केवल आडे **द्वितीय**- रमेश काकड, **उंच उडी - प्रथम**-केवल आडे, **द्वितीय**- मंगेश म्हैसने, **तिहेरी उडी - प्रथम -**पंकज परतेती, मंगेश म्हैसने **गोळा फेक -प्रथम**- संतोष बाट, **द्वितीय**-केवल आडे**थाळी फेक : प्रथम**- तुलाराम चटप, **द्वितीय**-कुलदीप अहाके, **भालाफेक :** प्रथम :- तुलाराम चटप, द्वितीय - कुलदिप आहाके.

## सांघीक विजेते पद :-

**हॉकी : प्रथम** विजेता रामटेक/कामठी संघ**, फुटबॉल :** प्रथम विजेता काटोल/सावनेरसंघ, **हॉलीबॉल :** प्रथम विजेता पोलीस मुख्यालयसंघ, **बास्केटबॉल :** प्रथमविजेता रामटेक/ कामठीसंघ, **खो -खो(महिला)** :प्रथम विजेता मुख्यालय संघ **खो -खो(पुरुष)** : प्रथम विजेता रामटेक/कामठीसंघ**कबड्डी (पुरुष**) : प्रथम काटोल/सावनेरसंघ, **कबड्डी (महिला) :**प्रथम विजेता नागपुर/उमरेडसंघ, **बेस्ट ॲथलेटीक्स (महिला)** : हेमलता परशुरामकर, **ॲथलेटीक्स (पुरुष):**पंकज परतेती,**जनरल चॅम्पीयनशिप** : पोलीस मुख्यालय या संघाने पटकविली आहे. विजेत्या खेळाडुंचे व संघाचे पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांनी हार्दीक अभिनंदन केले आहे व खेळाडुंच्या भविष्यातील खेळाकरीता शुभेच्छाही दिल्यात.

निरोप समारंभाच्या कार्यक्रमाच्या दिवशी १० वर्षाखालील मुला- मुलींकरीता पोता दौड व लिंबु चम्मच स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये पोता दौडमध्ये प्रथम क्रमांक शांतनु रविंद्र मानकर , व्दितीय क्रमांक आश्रय विजय डोंगरे, लिंबु चम्मच स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी रविंद्र बुराडे, व्दितीय क्रमांक स्नेहल संदीप पाचपिल्ले, संगीत खुर्चीमध्ये प्रथम क्रमांक सिमा अख्तर हया विजयी स्पर्धकांनाही बक्षीस देण्यात आले. तसेच पोलीस अधिकारी व आमंत्रित पाहुणे यांच्यामध्ये रस्सा खेचचीही स्पर्धा घेण्यात आली. आणि या स्पर्धेमध्ये प्रमुख पाहुण्यांची टीम विजेती ठरली.



या कार्यक्रमाला नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील अधिकारी व कर्मचारीवृंद मोठया संख्येत उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शनएम.आय.डी.सी बोरी पोलीस स्टेशनचे पोउपनि. श्री. तायडे तसेच सेंट जोसेफ कॉलेजच्या प्राध्यापिका सौ. मनिषा महात्मे यांनी केले.



